# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.२५/०७/२०२४

## "मुख्यमंत्री वयोश्री योजना"

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील जेष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक ती सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणे करीता तसेच मन:स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात **"मुख्यमंत्री वयोश्री योजना"** सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एक रकमी रु.३०००/- देण्यात येतील.

या रक्कमेमधून लाभार्थ्यांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डींग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, कंबर बेल्ट इ.आवश्यक साहित्य/उपकरणे खरेदी करता येईल.

दि.३१/१२/२०२३ अखेर ६५ वर्षे पूर्ण असावीत, उत्पन्न मर्यादा रु.२ लाखाच्या आत असावी, मागील ३ वर्षात अशा स्वरूपाचा लाभ घेतलेला नसावा असे या योजनेच्या पात्रतेचे निकष आहेत.

या योजनेतून लाभ मिळविण्यासाठी १) आधारकार्ड/मतदान कार्ड २) राष्ट्रीयकृत बँकेची बँक पासबुक झेरॉक्स ३) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ४)स्वयं घोषणापत्र ५)अन्य कोणतेही शासकीय ओळखपत्र या कागदपत्रांची आवश्यकता आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये या योजनेसाठी आवश्यक फॉर्म देण्याची व्यवस्था करण्यात आलेली असून मुख्यमंत्री वयोश्री योजनेस पात्र असलेल्या जास्तीत जास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**